प्रजावाणी दि. ०२/०६/२०२२

# बांधकाम व्यावसायिक बियाणी यांच्या हत्येप्रकरणी ६ जणांना अटक

## पोलीस उपमहानिरिक्षक निसार तांबोळी यांची पत्रकार परिषद




नांदेड,दि.१ः गँगस्टर रिंदाच्या हस्तकांनी कट रचून बांधकाम व्यावसायिक संजय बियाणींची हत्या घडवून आणली असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून या प्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आल्याची माहिती नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरिक्षक निसार तांबोळी यांनी दिली. दरम्यान, त्या सहा आरोपींवर कट रचून गुन्हा केल्याचे कलम लावण्यात आले असले तरी बियाणी यांच्या हत्येची ही प्राथमिक तपासाची सुरूवात आहे. या गुन्ह्यातील आणखी काही आरोपी पुढील आठवड्यात पकडले जातील असा विश्वास निसार तांबोळी यांनी व्यक्त केला.

दि.५ एप्रिल रोजी दिवसाढवळ्या बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांची त्यांच्या घरासमोर दुचाकीवरून आलेल्या दोन मारेकऱ्यांनी गोळ्या झाडून निर्घृणपणे हत्या केली होती. या प्रकरणी अज्ञात आरोपींविरुद्ध विमानतळ पोलीस स्थानकात कलम ३०२, ३०७, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याची उकल करण्यासाठी पोलीस उपमहानिरिक्षक निसार तांबोळी यांच्या आदेशाने विशेष पोलीस पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली होती.

पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली एसआयटी प्रमुख अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे व त्यांच्या मदतीला अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, पो. नि. द्वारकादास चिखलीकर, पो. नि. संतोष तांबे, सपोनि सर्वश्री पी.व्ही. माने, पांडुरंग भारती, संतोष शेकडे, शिवसांब घेवारे, चंद्रकांत पवार, पोउपनि सर्वश्री दशरथ आडे, गंगाप्रसाद दळवी, सचिन सोनवणे, आशिष बोराटे, दत्तात्रय काळे, गणेश गोटके व पोलीस कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. या पथकात २० पोलीस अधिकारी व ६० कर्मचारी सहभागी होते.

सदर गुन्ह्यातील आरोपींना पान २ वर